# विद्यापीठात 'वर्षा ऋतूतील राग' विषयावर २४ जुलैपासून कार्यशाळा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्र आणि संगीत व नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वर्षा ऋतूतील राग व त्यावर आधारित शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीत या विषयावर दि.२४ ते २६ जुलै या कालावधीत तीन दिवसांची कार्यशाळा दुपारी २ ते ५.३० या वेळेत लोकविकास केंद्र येथे आयोजित करण्यात आली आहे. कार्यशाळेत पावसाळ्यातील राग व त्यातील प्रभावी स्वर रचना आणि स्वर संगती यावर माहिती दिली जाईल. या प्रकारची गाणी सादर करण्यासाठीची कौशल्येही शिकविली जाणार आहेत. कार्यशाळेस ज्येष्ठ संगीततज्ज्ञ व संगीत नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.अंजली निगवेकर मार्गदर्शन करणार आहेत. इच्छुकांनी लोकविकास केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. मंजुषा देशपांडे यांनी केले आहे.



# यशप्राप्तीसाठी पारितोषिकांचे बळ

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'पदवी, पारितोषिक मिळते त्यावेळेस आपल्याला फार मोठ्या संधीचे अवकाश प्राप्त झालेले असते. यश प्राप्त करण्यासाठी हीच पारितोषिके बळ देणारी ठरतात,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या ५५वा दीक्षान्त समारंभप्रसंगाची पारितोषिके व स्मृतिचिन्हे प्रदान कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमामध्ये पारितोषिके वितरणानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्रसंगी कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते. अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव प्रमुख उपस्थित होते.

## कुलगुरू डॉ. शिंदे; विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्हे प्रदान

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, 'जीवनाच्या प्रवासात अनेक समस्या पुढे येत असतात. त्यावर मात करण्याची दृष्टी आपणास विकसित करता आली पाहिजे. समस्यांपेक्षा उपायांवर चर्चा केलेली अधिक चांगले. त्यामुळे आणखी एक संधी निर्माण होते. समाजापुढे जबाबदार नागरिक म्हणून गेल्यास शिवाजी विद्यापीठाच्या नावलौकिकामध्ये भर पडणार आहे. यासाठी सामाजिक जीवनामध्ये वावरताना शब्दाची जाण, दिशेचे भान आणि वडिलकीचा मान ठेवल्यास जबाबदार, आदर्श नागरिक निर्माण होतील. स्वतःमधील क्षमता विकसित करताना तुलनेच्या चक्रात पडण्यापेक्षा आत्मविश्वास, आणि विविध कौशल्यांचे बळ प्राप्त केल्यास निश्चित यश प्राप्त होते.'

यावेळी मान्यवरांच्या हस्ते ९१ पारितोषिके विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आली. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभाची पारितोषिके व स्मृतिचिन्हे विद्यार्थ्यांना प्रदान करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे, डॉ. ए. एम. गुरव आदी. (छाया : नाज ट्रेनर)

# आत्मविश्वास, कौशल्यांचे बळ प्राप्त केल्यास यश निश्चित

## कुलगुरू डॉ. शिंदे : दीक्षान्त समारंभाची पारितोषिके, स्मृतिचिन्हे प्रदान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पदवी, पारितोषिक मिळाल्यानंतर संधीचे अवकाश प्राप्त झालेले असते. स्वत:मधील क्षमता विकसित करताना तुलनेच्या चक्रात पडण्यापेक्षा आत्मविश्वास, विविध कौश्यल्यांचे बळ प्राप्त केल्यास निश्चित यश प्राप्त होते, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५५ वा दीक्षान्त समारंभप्रसंगाची पारितोषिके व स्मृतिचिन्हे प्रदान कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी अधिष्ठता डॉ. ए. एम. गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिंदे पुढे म्हणाले, जीवनाच्या प्रवासामध्ये अनेक समस्या पुढे येत असतात, यावर मात करण्याची दृष्टी विकसित करता आली पाहिजे. समस्यांपेक्षा उपायांवर चर्चा केलेली अधिक चांगले. त्यामुळे आणखी एक संधी निर्माण होते. समाजापुढे जबाबदार नागरिक म्हणून गेल्यास शिवाजी विद्यापीठाच्या नाव लौकिकामध्ये भर पडणार आहे. यासाठी सामाजिक जीवनामध्ये वावरताना शब्दाची जाण, दिशेचे भान आणि वडीलकीचे मान ठेवल्यास जबाबदार आणि आदर्श नागरिक निर्माण होतील.

याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते ९१ पारितोषिके विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आली. प्रास्ताविक परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी केले. नंदीनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

लोकमत

संडे अँकर । देवानंद शिंदे : शिवाजी विद्यापीठ दीक्षान्त समारंभप्रसंगाची पारितोषिके प्रदान

# समस्यांवर मात करण्याची दृष्टी विकसित करा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जीवनातील समस्येवर मात करण्याची दृष्टी आपणास विकसित करता आली पाहिजे. समस्यांपेक्षा उपायांवर चर्चा केलेली अधिक चांगली; त्यामुळे संधी निर्माण होते. समाजापुढे जबाबदार नागरिक म्हणून गेल्यास शिवाजी विद्यापीठाच्या नावलौकिकामध्ये भर पडणार आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षान्त समारंभप्रसंगाची पारितोषिके व स्मृतिचिन्हे प्रदान समारंभप्रसंगी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये झालेल्या कार्यक्रमामध्ये डॉ. शिंदे बोलत होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. शिंदे म्हणाले, स्वत:मधील क्षमता विकसित करताना तुलनेच्या चक्रात पडण्यापेक्षा आत्मविश्वास आणि विविध कौशल्यांचे बळ प्राप्त केल्यास निश्चित यश प्राप्त होते. पदवी, पारितोषिक मिळते त्यावेळेस आपल्याला फार मोठ्या संधीचे अवकाश प्राप्त झालेले असते. यश प्राप्त करण्यासाठी हीच पारितोषिके बळ देणारी ठरतात.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना ९१ पारितोषिके प्रदान करण्यात आली. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभप्रसंगाची पारितोषिके व स्मृतिचिन्हे प्रदान सोहळ्याप्रसंगी विद्यार्थ्यांसोबत कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, महेश काकडे, डॉ. विलास नांदवडेकर, आदी उपस्थित होते.